RNI No. MAHBIL /2009/31745

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष १२, अंक ३३] मंगळवार, मे १९, २०२६/वैशाख २९, शके १९४८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ४.००

**असाधारण क्रमांक ८३**

**प्राधिकृत प्रकाशन**

### जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर

**अधिसूचना**

**विशेष कार्यकारी अधिकारी यांची नेमणूक**

**शासन निर्णय क्रमांक.—**

१) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. विकाअ-११२५/प्र.क्र.-०५/का-५, दिनांक ०३/०२/२०२५.

२) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्र. विकाअ-११२५/प्र.क्र.-०५/का-५, दि. ११/०२/२०२५.

३) इकडील आदेश क्र.कार्यासन ७/गृह-१/आरआर /१८७९/२५, दिनांक ८/५/२०२६.

मी, शासन निर्णयाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून मी, **डॉ. विजय राठोड, भा.प्र.से., जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर** खाली नमुद **अनुसूचीमध्ये** विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे. ही नियुक्ती सामान्यतः **असाधारण राजपत्रात** प्रसिध्द झालेच्या दिनांकापासून ५ वर्षापर्यंत अस्तित्वात राहील. विशेष कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती विहित कालावधीनंतर आपोआप संपुष्टात येईल. तथापि, पोलीस पडताळणी अहवाल नकारात्मक प्राप्त झाल्यास नियुक्ती तात्काळ रद्द केली जाईल तसेच नियुक्तीच्या कालावधीत कोणतीही बेकायदेशीर कृती केल्यास किंवा त्याचेविरुध्द गंभीर गुन्ह्याची नोंद आढळल्यास किंवा शिक्षा झाल्यास किंवा त्यास नादार म्हणुन जाहीर केले असल्यास किंवा कोणत्याही कारणाशिवाय कोणतीही पूर्वसूचना न देता अशी नियुक्ती, मुदतपूर्व रद्द करण्याचे अधिकार मला राहील व तो पुनर्नियुक्तीस पात्र ठरणार नाही. विहित मुदत कालावधी संपुष्टात आलेवर किंवा त्यापुर्वीच संपुष्टात आणण्यात आल्यास विशेष कार्यकारी अधिकारी पदासाठी प्राप्त झालेले सर्व साहित्य संबंधित पोलीस ठाणे किंवा जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयामध्ये तात्काळ परत करण्याची प्राथमिक जबाबदारी सर्वस्वी संबंधित विशेष कार्यकारी अधिका-यांची राहील.

विशेष कार्यकारी अधिकारी हे खालील **अधिकार व कर्तव्ये** पार पाडण्यासाठी सक्षम राहतील :—

१. विशेष कार्यकारी अधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रातील नागरीकांचे शासकीय कामासाठी आवश्यकतेनुसार ओळखीचे व रहिवासाचे प्रमाणपत्र देता येईल.

२. वारंवार येणारा दुष्काळ, पूर, चक्रीवादळे आणि भूकंपासारख्या आपत्तीमुळे होणारी जिवितहानी, कोणतीही आकस्मित घटना जिच्यामुळे होणारी जिवित हानी, स्थावर मालमत्तेचे नुकसान, पुरात / नदीत वाहून गेलेले इत्यादीकरीता शोध व बचाव पथकास “आपदा मित्रास” तसेच स्थानिक पातळीवर महसूल, पोलीस, होमगार्ड, अग्निशमन, आरोग्य, शिक्षण व आपत्ती व्यवस्थापन इत्यादी विभागातील अधिकारी / कर्मचारी व इतर अशासकीय सदस्यांना पंचनामे तसेच इतर कार्य करणेस मदत करणे.

३. ग्रामीण भागात चोरी, शांततेचा भंग आणि जनतेस व गावातील समाजास हानी पोहचविण्याचे कृत्य तसेच सण उत्सवाच्या काळात अनूचित प्रकार घडू नये व सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पोलीस विभागाला मदत करणे.

४. शासनाच्या विविध योजनांचा प्रचार व प्रसार करणाऱ्या ग्रामस्तरीय अधिकारी, नगरपालिका व महानगरपालिका स्तरावरील अधिकारी यांना आवश्यक ते सहकार्य करणे.

५. निवडणुकीचे कामात मृत मतदारांची नावे, घर सोडून गेलेल्या व इतर कारणामुळे कमी झालेल्या मतदारांची माहिती निवडणूक विभागात देण्याकरीता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना मदत करणे.

६. आपले सेवा केंद्र, महा ई-सेवा केंद्र/आधार केंद्रावर विविध कागदपत्रांकरीता नागरिकांना आवश्यक ते सहकार्य करणे.

७. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, स्वच्छता, कृषि, पशुसंवर्धन इ. विषयाबाबत नागरीकांना आवश्यक ते सहकार्य करणे.

८. हुंडा, व्यसनाधीनता, बालमजुरी, बालविवाह, वेठबिगारी प्रथा संपविण्यासाठी शासनास सहकार्य करणे.

९. महिला, मुले व वृध्दांचे सुरक्षेसाठी शासनाचे अधिकारी यांना सहकार्य करणे.

१०. प्रदुषण नियंत्रणासाठी व वाहतूकीचे नियमन करण्यासाठी शासनास सहकार्य करणे.

११. पोलीसांकडून दाखल करण्यात येणाऱ्या महत्वाच्या गुन्ह्यांच्या तपासामध्ये कराव्या लागणाऱ्या विविध पंचनाम्यांमध्ये पंच म्हणून काम करणे.

१२. समाजामध्ये एकोपा तसेच सलोख्याचे व सुरक्षित वातावरण राहावे याकरीता पोलीस विभागाच्या कामामध्ये आवश्यक ते सहकार्य करणे.

१३. शासनाचे विविध सर्वेक्षणे, जनगणना, मोहिमा अभियान यामध्ये संबंधित विभागाला आवश्यक ती मदत करणे.

विशेष कार्यकारी अधिकारी हे खालील **सर्वसाधारण तरतुदी** पार पाडण्यासाठी सक्षम राहतील:-

१. विशेष कार्यकारी अधिकारी हे ग्रामसभेमध्ये विशेष निमंत्रीत सदस्य असतील.

२. विशेष कार्यकारी अधिकारी हे राष्ट्रीय सण व उत्सवामध्ये ग्राम पातळीवर विशेष निमंत्रीत सदस्य असतील.

३. विशेष कार्यकारी अधिकारी यांना राज्य शासनाच्या तालुकास्तरीय विभागात /कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांच्या भेटीकरीता प्राधान्य असेल.

४. विशेष कार्यकारी अधिकारी हे ग्रामस्तरीय दक्षता समितीमध्ये निमंत्रीत सदस्य असतील.

५. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणुन केलेली नियुक्ती **“मानसेवी”** असल्यामुळे विशेष कार्यकारी अधिकाऱ्याला कोणतेही मानधन अथवा वेतन / भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

६. विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त झालेल्या व्यक्तींनी त्यांच्या घरावर / दुकानावर / कार्यालयावर स्वतःच्या नावांसह “विशेष कार्यकारी अधिकारी” असा फलक लावावा. त्यांच्या नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यावर लागलीच फलक काढावेत. तथापि, त्यांनी त्यांच्या कुठल्याही वाहनांवर “विशेष कार्यकारी अधिकारी” असा उल्लेख करु नये.

७. कोणत्याही शासकीय/निमशासकीय/बँक/महामंडळ/स्थानिक स्वराज्य संस्था इ. आस्थापनांमधील कार्यरत अधिकारी/ कर्मचारी यांची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात येणार नाही.

८. एकाच कुटुंबातील एकापेक्षा अधिक व्यक्तींची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात येणार नाही.

## अनुसूची

| अ. क्र. | विशेष कार्यकारी अधिकारी पदी नियुक्त व्यक्तीचे नांव | पत्ता | वय | शिक्षण | नोंदणी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | सुरज अशोककुमार राठी | इचलकरंजी | ३४ | पदवीधर | 2026/35/ 950174817855 / ICHALKARNJI/1 |
| २. | आफताब रियाज जमादार | इचलकरंजी | २५ | १२ वी | 2026/35/ 313846863014 / ICHALKARNJI/2 |
| ३. | दत्तात्रय संभाजी कनोजे | इचलकरंजी | ६१ | १०वी | 2026/35/ 969727002552 / ICHALKARNJI/3 |
| ४. | सुमित मोहन बोरगांवे | शहापूर | २९ | १२ वी | 2026/35/ 384117020866 / ICHALKARNJI/4 |
| ५. | सुप्रिया मुरलीधर कांबळे | इचलकरंजी | ३३ | १२ वी | 2026/35/ 212677905835 / ICHALKARNJI/5 |
| ६. | महानंदा आण्णासो पाटील | इचलकरंजी | ४९ | पदवीधर | 2026/35/ 861186893798 / ICHALKARNJI/6 |
| ७. | वैशाली राजाराम गिरी | इचलकरंजी | ५१ | १२ वी | 2026/35/ 358513993232 / ICHALKARNJI/7 |
| ८. | दिग्विजय सर्जेराव पाटील | इचलकरंजी | ४० | पदवीधर | 2026/35/ 562249011492 / ICHALKARNJI/8 |
| ९. | सागर चांगदेव पाटील | इचलकरंजी | ३९ | १२ वी | 2026/35/ 355043216877 / ICHALKARNJI/9 |
| १०. | आनंद श्रीकांत चंगेडीया | इचलकरंजी | ३० | १०वी | 2026/35/ 400595982238/ ICHALKARNJI/10 |
| ११. | सुमित शरदकुमार सुरपुरीया | इचलकरंजी | ४५ | १२ वी | 2026/35/ 603494328575 / ICHALKARNJI/11 |
| १२. | शुभम बाबासो चौगुले | इचलकरंजी | ३० | १०वी | 2026/35/ 231214168572 / ICHALKARNJI/12 |
| १३. | सतिश बळवंत घोरपडे | इचलकरंजी | ३९ | १२ वी | 2026/35/ 745143227459 / ICHALKARNJI/13 |
| १४. | किशोर धन्यकुमार नेजे | शहापूर | ४० | १०वी | 2026/35/ 531537649918 / ICHALKARNJI/14 |
| १५. | पंकज आकाराम कांबळे | शहापूर | ६२ | १२ वी | 2026/35/ 457141045876 / ICHALKARNJI/15 |
| १६. | विजय बाबगोंडा पाटील | चंदूर | ४७ | १०वी | 2026/35/ 464592139312 / ICHALKARNJI/16 |
| १७. | नसरीन हबीब जमादार | इचलकरंजी | ३८ | १२ वी | 2026/35/ 949684427844 / ICHALKARNJI/17 |
| १८. | अमित महावीर जैन | इचलकरंजी | ३८ | १२ वी | 2026/35/ 662000203258 / ICHALKARNJI/18 |

| अ. क्र. | विशेष कार्यकारी अधिकारी पदी नियुक्त व्यक्तीचे नांव | पत्ता | वय | शिक्षण | नोंदणी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १९. | वर्षाराणी सुरेश पाटील | इचलकरंजी | ४० | पदवीधर | 2026/35/ 299712478151 / ICHALKARNJI/19 |
| २०. | बाबासो आबा आवळे | कोरोची | ६२ | पदवीधर | 2026/35/ 644596674189 / ICHALKARNJI/20 |
| २१. | डॉ.सौ. प्रियांका प्रसाद इंगवले | इचलकरंजी | ३२ | १२ वी | 2026/35/ 933468454191 / ICHALKARNJI/21 |
| २२. | अर्चना सुरज कुडचे | इचलकरंजी | ४५ | १२ वी | 2026/35/ 249227770758 / ICHALKARNJI/22 |
| २३. | विद्या गजानन लवटे | इचलकरंजी | ३७ | १०वी | 2026/35/ 788908215692 / ICHALKARNJI/23 |
| २४. | कल्पना सुरेश माळी | इचलकरंजी | ५२ | पदवीधर | 2026/35/ 868555500742/ ICHALKARNJI/24 |
| २५. | कलावती आण्णासो भोसले | इचलकरंजी | ४७ | १२ वी | 2026/35/ 999109439380/ ICHALKARNJI/25 |
| २६. | नंदा सुर्याजी साळुंखे | इचलकरंजी | ५६ | १२ वी | 2026/35/ 573752667349/ ICHALKARNJI/26 |
| २७. | स्नेहा प्रणव नेसरीकर | इचलकरंजी | ३२ | पदवीधर | 2026/35/ 397354407140 / ICHALKARNJI/27 |
| २८. | मुनजा साहिल मुजावर | इचलकरंजी | २६ | पदवीधर | 2026/35/ 945186985844/ ICHALKARNJI/28 |
| २९. | नितीन चंद्रकांत सुतार | कबनूर | ३७ | पदवीधर | 2026/35/ 480205373082/ ICHALKARNJI/29 |
| ३०. | विनायक शिवशंकर गुंडकल्ले | कबनूर | ३६ | १२ वी | 2026/35/ 932592396800 / ICHALKARNJI/30 |
| ३१. | नितीन शंकर गवळी | कबनूर | ४७ | १२ वी | 2026/35/ 453845614132/ ICHALKARNJI/31 |
| ३२. | सचिन पोपट चौगुले | तारदाळ | ३८ | पदवीधर | 2026/35/ 623407962914 / ICHALKARNJI/32 |
| ३३. | अशोक हणमंत कुंभार | कोरोची | ३८ | १२ वी | 2026/35/ 890341010625/ ICHALKARNJI/33 |
| ३४. | संजय विठ्ठल जिंदे | चंदूर | ४२ | १२ वी | 2026/35/ 995505688234/ ICHALKARNJI/34 |
| ३५. | प्रविण प्रकाश मगदूम | तारदाळ | ३३ | १०वी | 2026/35/ 749970013532/ ICHALKARNJI/35 |
| ३६. | योगेश संतोष वाणी | तारदाळ | २६ | पदवीधर | 2026/35/ 866628728050/ ICHALKARNJI/36 |
| ३७. | रणजित शामराव माने | तारदाळ | ४३ | पदवीधर | 2026/35/ 860737380568/ ICHALKARNJI/37 |

| अ. क्र. | विशेष कार्यकारी अधिकारी पदी नियुक्त व्यक्तीचे नांव | पत्ता | वय | शिक्षण | नोंदणी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| ३८. | मोनिका राजेंद्र गंथडे | तारदाळ | ३० | १२ वी | 2026/35/ 952147455897/ ICHALKARNJI/38 |
| ३९. | वनिता विनोद माने | तारदाळ | ३५ | १०वी | 2026/35/ 823869003897/ ICHALKARNJI/39 |
| ४०. | सविता प्रदीप शिंदे | खोतवाडी | ३८ | पदवीधर | 2026/35/ 922428479164/ ICHALKARNJI/40 |
| ४१. | योगेश राजेंद्र माने | खोतवाडी | ३५ | १२ वी | 2026/35/ 221278638072 / ICHALKARNJI/41 |
| ४२. | गणेश सदाशिव सुतार | खोतवाडी | ४१ | १०वी | 2026/35/ 754428304422 / ICHALKARNJI/42 |
| ४३. | नेहा उल्हास मंडलिक | इचलकरंजी | ४७ | १०वी | 2026/35/847168074409 / ICHALKARNJI/43 |
| ४४. | शिवानी लिंगाप्पा गजबर | १२३०, ए वॉर्ड, मिराबा शालिनी पॅलेस, डी मार्टजवळ, रंकाळा, कोल्हापूर | २९ | बी.एस.सी. | 2026/35/363035950089 / KARVIR/01 |

**डॉ. विजय राठोड** (भा. प्र. से.),
जिल्हाधिकारी तथा,
जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.